महाराष्ट्र शासन
मृद व जलसंधारण विभाग
आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.)
वाल्मी परीसर, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर-४३१००२

## जाहीर सूचना

मृद व जलसंधारण विभागाच्या अधिपत्याखालील जलसंधारण अधिकारी, (स्थापत्य) गट "ब" (अराजपत्रित) या संवर्गातील ६७० पदे सरळसेवेने भरण्यासाठी दि.१९/१२/२०२३ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदरहू परीक्षा ही शासन मान्य टि. सी. एस. या कंपनीमार्फत, राज्यातील २८ जिल्हयातील निश्चित केलेल्या एकूण ६६ केंद्रांवर दि. २०/०२/२०२४ व दि.२१/०२/२०२४ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आली होती.

दि.२१/०२/२०२४ रोजी सत्र ०१ (सकाळी ९.०० ते ११.००) दरम्यान ARN Associate, ड्रिमलँड, नांदगाव पेठ, अमरावती शहर येथील परीक्षा केंद्रावर श्री. यश अनंत कावरे या परीक्षार्थीच्या प्रवेश पत्राच्या झेरॉक्स प्रतीवर खालील बाजूस A, B, C, D अशा स्वरुपात उत्तरेसदृष्य माहिती असल्याचे आढळून आले होते. या अनुषंगाने, गृह विभागाच्या अहवालानुसार, नांदगाव पेठ, अमरावती शहर येथे गुन्हा क्र.६३/२०२४, कलम ४१७, ४२०, ४६७, ४६८,४७१, १२० (ब), २०१ (भादंवि सहकलम ६६ (ड) माहिती तंत्रज्ञान कायदा सह कलम ७, महाराष्ट्र विद्यापीठाच्या मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ठ परीक्षेमध्ये होणाऱ्या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम, १९८२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात पोलीस अहवालानुसार आजपावेतो एकूण १३ आरोपींना अटक करण्यात आली असून यामध्ये टिसीएस कंपनीचे अमरावती येथील स्थानिक कर्मचारी व त्यांचे प्राधिकृत ARN Associate, ड्रिमलँड, नांदगाव पेठ, अमरावती शहर या ऑनलाईन परीक्षा केंद्राचे कर्मचारी यांचा देखील समावेश आहे.

सबब, परीक्षा घेणाऱ्या टिसीएस या कंपनीतील या परीक्षा केंद्राशी संबंधित काही कर्मचारी या गैरप्रकारात सहभागी असल्याचे प्रथमदर्शनी आढळून आले. यामुळे एकूणच सदरहू परीक्षेची विश्वासार्हता व पारदर्शकता यावर काही अंशी प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून या परीक्षेविषयी परीक्षार्थींच्या मनात संशय निर्माण होण्यास वाव मिळाला आहे. सदर प्रकरणी अनेक उमेदवारांकडून दिनांक २० व २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी घेण्यात आलेली परीक्षा रद्द करावी व सदर परीक्षेची प्रक्रिया पुन्हा नव्याने घ्यावी, अशी विनंती शासनाकडे विविध स्तरावर केलेली आहे.

उक्त परीक्षेत झालेला हा गैरप्रकार प्रथमदर्शनी एका केंद्रापुरता दिसत असला तरी, एकूण परीक्षा कार्यपध्दती व पारदर्शकतेविषयी परीक्षार्थींच्या मनात काही अंशी संशय निर्माण करणारा ठरला आहे. या गुन्ह्यात गृह विभागाच्या अहवालानुसार आतापर्यंतच्या पोलीस तपासात अटक केलेल्या आरोपींची संख्या, मे. टि.सी.एस (TCS) या कंपनीचे स्थानिक कर्मचारी व त्यांच्या अमरावती शहरातील ARN Associate या प्राधिकृत ऑनलाईन परीक्षा केंद्राचे कर्मचारी यांचा प्रथमदर्शनी काही अंशी सहभाग आढळून आलेला दिसतो. यामुळे सदरहू परीक्षा रद्द करून फेर परीक्षा घेण्याची परीक्षार्थींची मागणी याबाबत सांगोपांग विचार होऊन, **"जलसंधारण अधिकारी-गट ब अराजपत्रित" या पदासाठी दि. २० व २१ फेब्रुवारी, २०२४ रोजी मे. टि.सी.एस. (TCS) या कंपनीच्या माध्यमातून घेण्यात आलेली परीक्षा रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.** फेरपरीक्षेबाबत व अनुषंगिक कार्यपद्धतीबाबत सविस्तर सूचना स्वतंत्रपणे देण्यात येतील.

सबब, सर्व संबंधीत परीक्षार्थींनी याची नोंद घ्यावी.

15|3|2024

(सुनील चव्हाण भाप्रसे)
आयुक्त तथा अध्यक्ष
राज्यस्तरीय निवड समिती
मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर

दिनांक : १५/०३/२०२४